महाराष्ट्र शासन
गृह विभाग
कारागृह व सुधारसेवा विभाग

सुधारणा व पुनर्वसन
फोन क्र : (०२०) २६१२३५६३
फॅक्सक्र: (०२०) २६१२५८७८
Email-igoffice.ddo-mh@gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,पुणे ४११ ००१

जा.क्रं.लेखा/MJPJAY & AB-PMJAY/ आयुकार्ड/ 11088 /२०२५,कक्ष-५,पुणे ०१ दि. 13/१२/२०२५

**विषय- एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत आयुष्मान कार्ड व वय 70 वर्ष त्या पेक्षा अधिक असलेल्या वृद्ध व्यक्तीचे वयवंदन आयुष्मान कार्ड बनविणे बाबत..**

**संदर्भ-दिनांक-28/11/2025 रोजीच्या बैठकीतील निर्णया नुसार.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संपूर्ण देशभरात एकसमान (को-ब्रँडेड) आयुष्मान कार्ड देण्याचा निर्णय राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाने घेतला आहे.त्यानुषंगाने राज्यातील महापालिका / नगरपालिका क्षेत्रात आयुष्मान कार्ड वितरणाची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. महापालिका / नगरपालिका क्षेत्रात सर्वत्र आयुष्मान कार्ड शिबिरे घेण्यात सांगितली आहेत.

### प्रमुख ठळक बाबी आणि राष्ट्रीय स्तरावरील ओळखपत्र

- **राष्ट्रीय स्तरावरील ओळखपत्र:** केंद्र आणि राज्य सरकारच्या आरोग्य योजनांच्या लाभार्थ्यांसाठी आयुष्मान कार्ड असणे आवश्यक आहे.
- **दोन योजनांचे एकत्रीकरण:** आयुष्मान कार्डद्वारे महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत या दोन्ही योजनांच्या लाभार्थ्यांना एकत्रित व राष्ट्रीय स्तरावरील **को-ब्रँडेड ओळखपत्र** दिले जात आहे.
- आरोग्य संरक्षण: महात्मा फुले जनआरोग्य व आयुष्मान भारत योजनांतर्गत लाभार्थ्यांना ५ लाख रुपयांपर्यंत आरोग्य सुरक्षा कवच (उपचार लाभ) मिळते,

### या योजनेचे मुख्य तपशील आणि फायदे खालीलप्रमाणे आहेत

- **उपचार व शस्त्रक्रिया**
- **प्रति कुटुंब, प्रति वर्ष आरोग्य संरक्षण**
- **शासकीय व खाजगी रुग्णालये**

### कार्ड तयार करण्याकरीता

लाभार्थी त्यांच्या स्वतःच्या मोबाईल ॲपद्वारे / पोर्टलद्वारे आयुष्मान कार्ड तयार करू शकतात

1. **वेबसाइट किंवा ॲपला भेट द्या:** गुगल प्ले स्टोरमधून **'Ayushman App'** डाउनलोड करा किंवा या पोर्टलला भेट द्या: **https://beneficiary.nha.gov.in/**
2. **लाभार्थी पर्याय निवडा:** मोबाईल ॲप / पोर्टलमध्ये **Beneficiary** (लाभार्थी) पर्याय निवडा.

3. **लॉगिन करा:** आपला **मोबाईल क्रमांक, कॅप्चा** व **मोबाईल OTP** (वन टाइम पासवर्ड) च्या सहाय्याने लॉगिन करा.
4. **माहिती निवडा:** आपले **राज्य, योजना, जिल्हा निवड** व **आधार क्रमांकाच्या** आधारे कुटुंबाचा तपशील प्राप्त करा.
5. **ई-केवायसी करा:** ज्या लाभार्थ्यांची ई-केवायसी करायची आहे, त्यांच्या नावापुढील **ई-केवायसी पर्यायावर क्लिक करा.**
6. **आधार प्रमाणीकरण:** आधार OTP किंवा सहूलियतने (सोयीनुसार) आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करा.
7. **माहिती भरा: फोटो कॅप्चर** करा, **अतिरिक्त माहिती** भरा व **सबमिट** बटणावर क्लिक करा.
8. **कार्डची मंजुरी:**
    - जर आपले आधार व रेशनकार्ड **८०% पेक्षा जास्त जुळत** असेल, तर आपले कार्ड **तात्काळ मंजूर** होईल.
    - अन्यथा, कार्ड मंजुरीसाठी **मंजुरी संस्थेकडे** पाठवले जाईल.
9. **कार्ड डाउनलोड:** मंजुरी संस्था **२ ते ७ दिवसांत** आपले कार्ड **मंजूर** करतील. कार्ड मंजूर झाल्यानंतर आपण आपले कार्ड **डाउनलोड** करू शकता

## आयुष्मान कार्ड बनविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

1. **अद्ययावत शिधापत्रिका** (अपडेटेड रेशन कार्ड)
2. **आधार कार्ड**
3. **आधारशी जोडलेला मोबाईल** (आधारशी लिंक केलेला मोबाईल नंबर)

## कारागृहातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना लाभ देणे बाबत

- **पात्रतेचे निकष:** महापालिका / नगरपालिका हद्दीत रहिवासी असलेले, परंतु अत्यंत आवश्यक असलेले कारागृह अधिकारी / कर्मचारी यांना आयुष्मान कार्डाच्या निकषांत येत असल्यास, त्यांना प्रशासकीय निर्णयानुसार राज्य आरोग्य विमा योजनांमधून सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.त्यामुळे कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वत:चे व त्यांच्या नातेवाईकांचे आयुष्मान कार्ड व वय 70 वर्ष किंवा त्या पेक्षा अधिक असलेल्या घरातील वृद्धांचे वय वंदन आयुष्मान कार्ड सार्वजनिक आरोग्य विभागाचे आरोग्य मित्र यांचे कडुन तयार करुन घ्यावे.

**कारागृहात बंदिस्त असलेल्या बंदयाना लाभ देणे बाबत.**

- **पात्रतेचे निकष:** राज्यातील महापालिका / नगरपालिका हद्दीत रहिवासी असलेल्या बंदयाचे ज्योतिराव फुले जन आरोग्य आयुष्मान कार्ड व राज्या बाहेरील अधिवास असलेले बंदयाचे आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत आयुष्मान कार्ड सार्वजनिक आरोग्य विभागाचे आरोग्य मित्र यांचे कडुन तयार करुन घ्यावे.**(सदर बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविण्यात आलेल्या पत्राची छायांकित प्रत)**

**कारागृहात बंदिस्त असलेल्या 70 वर्ष किंवा त्या पेक्षा अधिक वय असलेल्या बंदयाना लाभ देणे बाबत.**

- **(Vay Vandana Ayushman Card)**: केंद्र सरकारने आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेची व्याप्ती वाढवली आहे. आता देशातील 70 वर्षांपेक्षा जास्त वय असलेले कोणीही आयुष्मान कार्ड बनवू शकणार आहे. त्यासाठी उत्पन्नाची अट नाही. आयुष्मान कार्डमध्ये पाच लाखांपर्यंतचा विमा दिला जात आहे. कोणत्याही रुग्णालयात पाच लाखांपर्यंतचे उपचार मोफत होणार आहे.आयुष्मान कार्ड बनवण्यासाठी वृद्धांना कोणत्याही कार्यालयात जावे लागणार नाही. फक्त त्यासाठी काही महत्त्वाची कागदपत्रे लागणार आहे. ही कागदपत्रे असताना मोबाईल

ॲपद्वारेच कार्ड बनवले जाणार आहे. वृद्ध लोकांनी हे आयुष्यमान कार्ड बनवल्यानंतर त्यांना अनेक गंभीर आजारांवर रुग्णालयात मोफत उपचार करता येणार आहेत.

**अशा व्यक्तीसाठी नवीन कार्ड:**

कुटुंबातील कोणताही सदस्य आयुष्मान भारत योजनेचा लाभ घेत असेल आणि त्या कुटुंबात एक वृद्ध व्यक्ती असेल तर आता त्या वृद्ध व्यक्तीचे नवीन कार्ड वेगळे केले जाईल. त्यासाठी नोंदणीही नव्याने करावी लागणार आहे. कार्ड बनवल्या नंतर वृद्धांना कोणत्याही रुग्णालयात 5 लाख रुपयां पर्यंतचे मोफत उपचार करता येणार आहेत.केंद्र सरकारच्या आरोग्य योजनांचा लाभ घेणारे 70 वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे वृद्ध देखील आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आयुष्मान कार्ड बनवण्याचा पर्याय निवडू शकतात,

**( सुहास वारके )**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

**प्रति,**

१.प्रादेशिक कार्यालय प्रमुख (सर्व)
२.प्राचार्य,दौ.जा.तु.अ.प्र.महाविदयालय / किशोर सुधारालय,नाशिक
३.कारागृह अधीक्षक (सर्व) मध्यवर्ती / जिल्हा / खुले कारागृह / रत्नागिरी विशेष कारागृह /
४.संपर्क अधिकारी ,स्वतंत्रपुर खुली वसाहत आटपाडी जि.सांगली
५.कक्ष अधिकारी कक्ष क्र-१३ ई-सेलअ.पो.म.स व का.म.नि कार्यालय,पुणे यांना संकेत स्थळावर प्रसिध्दी करिता.